कायम विनाअनुदानित तत्वावर
~~विनाअनुदान तत्वावर~~

जा.क्र.प्रा./प्राशि/खाप्राशा/मान्यता/पुवि २२/०३-०

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,

पुणे - १ यांचे कार्यालय.

दिनांक :- 15 NOV 2003

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,

~~शिक्षण प्रमुख~~/प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ, पिंपरी-चिंचवड, पुणे.

विषय :- सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत. ( माध्यम - उर्दू )

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक-पिएलएस/१००३/५०९/२००३ प्राशि ३ दिनांक २४ जुन २००३.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमुद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, २००३ पासून इयत्ता १ ली ते सन२००३-०४ या शैक्षणिक वर्षात ~~प्रत्यक्ष सुरु असलेल्या इयत्तेस प्रत्येकी एक तुकडीस~~ शाळा सुरु करण्यास खाली नमुद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर ~~विनाअनुदान तत्वावर~~ / कायम विनाअनुदान तत्वावर ~~"खास बाब" म्हणून~~ परवानगी देण्यात येत आहे. ~~तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदानित तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.~~

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १] | अलमनार एज्यु. सोसायटी कुडळवाडी | अलमनार प्रायमरी स्कूल उर्दू कुडळवाडी<br>कायम विना अनुदान | १ ली च्या वर्गास फक्त | उर्दू |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनविषयक सुविधा इत्यादी शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.

Created in Photo-to-PDF One Click Converter. Download here: https://firehawk.ai/phototopdf/